
# देवपाखरू

सौ. मुमताज रहिमतपुरे



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा. वा.
दा. क्र. १८३८
BVBK-0401738

# देव पाखरू

सौ. मुमताज र

वाचनालय
बा.वा.
१७३८
२२१२८८

BVBK-0401738

बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. १७३८
दिनांक

प्रचार प्रकाशन, कोल्हापूर-४१६ ००८

देव पाखरू

Dev Pakharu

सौ. मुमताज रहिमतपुरे

Sou. Mumataj Rahimatpure

प्रकाशन क्रमांक ३२

प्रथम आवृत्ती १९८४

प्रकाशक /
सौ. नंदिनी तु. गवळी
५१३ ब, प्लॉट नं. ४ अ, नलवडेमाळ,
प्रतिभानगर पिछाडीस, सागरमाळ,
कोल्हापूर–४१६००८

मुद्रक /
दि. गं. कुलकर्णी
राजहंस प्रिंटींग प्रेस
नागाळा पार्क, कोल्हापूर–४१६००३
फोन : २३९०६

मूल्य / रु. ५ फक्त

© इकबाल कासिम रहिमतपुरे

मुखपृष्ठ / स्टुडिओ मयूर / मधुकर ओतारी

ब्लॉक / उदय प्रोसेस

– प्रमुख वितरक –
मे. सिद्धार्थ बुक सेंटर, गाळा नं. २० प्रतिभानगर मार्केट
सागरमाळ, कोल्हापूर–४१६००८

म. ग्रं. सं. ठाणे,
बाल वाङ्मय विभाग.
दिनांक
क्र. ९६३८ 22.12.1

# देव पाखरू

' बाई, तुमची बदली झाली ! '

' बदली झाली ? कुठं ' माझा आनंदी स्वर.

' माढ्याला ! '

' कुठशी आहे ते ? ' मी उत्सुकतेने विचारले.

' सोलापूर जिल्ह्यात. '

' अगदी एका बाजूला हे गाव आहे. खेडंच आहे म्हणाना. घर मिळायला अडचण. करमणुकीचं काहीच साधन नाही आणि एकमेव जिल्हा परिषदेचे हायस्कूल आहे. आता बाई, तुमचं कसं होणार ? '

मग मीही गंभीर चेहरा केला. घरी मात्र आनंदाने परतले. ' अरे फारूक, आपली बदली झाली ! ' म्हणून दारातूनच मी आरोळी ठोकली. तसा त्याचाही चेहरा फुलला. म्हणाला. . . ' बरं झालं दीदी ! आता आपल्याला नवीन गाव पहायला मिळेल ! '

मी आनंदानं होकार दिला.

‘ आणि मला नवीन शाळा, नवीन गुरुजी, नवीन मित्र मिळतील – नव्या वह्या – पुस्तकांबरोबर ! ’ त्यानं उत्साहानं सांगायला सुरूवात केली.

‘ हो. पण तिथं आपल्या रयत शिक्षण संस्थेचं हायस्कूल नाही. जिल्हा परिषदेचं आहे, ’ मी आपलं त्याला सांगून टाकलं.

‘ असू दे. पण हायस्कूल आहे ना ? ’ त्याचं उत्तर.

शेवटी निघायचा दिवस आला. सर्वांनी दुःखी अंतःकरणाने मला निरोप दिला. तीन वर्षे एका ठिकाणी राहून लोभ जडवून व लावून जायचं म्हणून मीही गदगदले होते.

माढेश्वरीचं मंदिर व किल्याच्या दर्शनानं गावाबद्दल उत्सुकता वाढली. घर मिळायला तशी अडचण पडली. चुना मातीत बांधकाम केलेलं. धाब्याचं दुमजली चाळवजा घर, यातल्या दोन खोल्या मिळाल्या. भिंतीचे पोपडे जागोजागी पडलेले. घर पाहून जरा नाराज झाले. पण सामान लावलं.

नवीन कॉलेजमध्ये जुळवून घेण्यात, फारूकची वह्या, पुस्तके नवीन शाळा यांमध्ये प्राथमिक दिवस गेले. मग शोध घ्यायला सुरवात झाली. इथं नवीन पहायला काय आहे ! किल्ला पडलेला. नुसती दर्शनी भिंत व दोनतीन बुरूज धडक्या अवस्थेत असणारे. माढेश्वरीचं देऊळ व परिसर प्रसन्न करणारं.

पंढरपूरच्या विठोबाची खरी मूर्ती माढ्याच्या एका देवळात आहे असं वाचल्याचं आठवलं.ते देऊळ पाहिलं. मूर्ती छानच आहे. मग एकाला सहजच विचारलं – ‘ इथल्या शेतात कोणकोणते

पक्षी दिसतात ? ' कळलं ' वल्हे आहेत. पारवे आहेत. तित्तर आहेत. आणि रानातून मोर आहेत बघा. '

' मोर नेमके कुठे दिसतात हो ? ' विचारलं. त्याने एका रस्त्याच्या दिशेनं हात केला, म्हणाला– ' ह्या रस्त्यानं गेल्यावर कानडे मळा लागतू मैलावर. त्यांच्या शेतात हायती मोर. '

मला, फारूकला मोरांचं अतीव आकर्षण. रानातले मोर पहायला मिळावेत ही इच्छा होती. ती इथं पूर्ण होणार म्हणून आनंदीत झालो.एका सायंकाळी,पाचच्या सुमारास आम्ही मोरांचा शोध घ्यायला निघालो. आम्ही उत्साहाने वाट कापू लागलो, इतक्यात एका इसमाने हटकले. म्हणाला, 'कुठं ?' ' इथं कानडी मळा कुठं आहे हो ? तिकडं जायचं ? ' मी उगाच विचारलं.

' कशाला ? '

' मोर पहायला ! '

तो आपल्या नादातच हसला. म्हणाला, ' मोर पहायलं ? चला. चवरे वस्तीवर चला. मंग मुलं देतू सोबत ! '

' चवरे वस्ती ? म्हणजे आमच्या घरमालकाचं ... '

' तुमच्या घरमालकाचं भाव हाय मी ! '

तो मोर दाखवायला मुलं देतो म्हणाला. आमचा उत्साह द्विगुणित झाला. त्याच्याबरोबर चालू लागलो.

आम्ही गप्प चालू लागलो. तो म्हणत होता – ' आधी वस्तीवर जाऊं. चहापानी घ्या मंग जावा मोर बघाय् ! '

त्याच्या आग्रहाला ना म्हणवेना, कारण त्यांच्या वस्तीवर मोर दाखवणारे वाटाडे मिळणार होते.

चहापाणी - ओळखी पाळखी - कुतूहल - प्रश्न - उत्तरे सारं झालं. मोर पहायला ही माणसं आलीत हे पाहून त्याना गंमत वाटत होती. डोकीवरचा पदर सावरीत एकजण मात्र म्हणाली ' लई छान पाखरु हाय बघा. मी एकदा सकाळच्या पारी पावसात मोराला नाचताना बघितलंय. काय त्येचा तो देखणा पिसारा दिसतू ! '

उत्साही वीर आम्हाला वाट दाखवायला निघाले. पांदयापांदयातून शेतातून पायवाट काढीत चढ-उतार करीत निघालो. मध्येच बाभूळवन लागलं. बाभळीची झुडपं-झाडं इतस्ततः वाढली होती.वाटेत काटेच काटे होते. त्यामुळं काळजी-पूर्वक चालावं लागे. नाहीतर पायावर काटे फराटे मारत होते.

आतापर्यंत खूपच लांब आलो होतो. ओढा पार करून वस्ती गाठली होती. आता हे बाभूळवन. वाटाड्या थांबला. म्हणाला –' यो कानडे मळा ! पण मोर आनकी वर सरकल्यात जनू ! ' हातात दगड घेत पुढं म्हणाला – ' हतं चावरी कुत्री हायती. जरा सांभाळून चला. '

शेवटी कानडे मळा टाळून वरवर जात राहिलो. इतक्यात ' म्याओ ऽऽ, म्या ऽऽ ओ ऽऽ ' दीर्घ आरोळी कानावर आदळली. जवळपास मोर होता. भरभरा चालू लागलो. अंधार पडायला सुरवात झाली होती. चिंचेची मोठीच्या मोठी झाडं लिंबाच्या

झाडाबरोबरीने होती. बाजूला केंदाळ भरलेलं. छोटा ओढा होता. समोर पांदी होती. त्याचे पुढे ऊसाचे शेत.

अचानक एक पोर म्हणालं– ‘ त्यो बघा मोर ! ’



हळू आवाजात ‘ कुठं कुठं ’चा नारा झाला. त्याने बोट केलं त्या दिशेने पाहिलं. झोकदार हिरवा पिसारा दिसला. मग तुर्रेदार मान. पाठमोरा मोर दिसला. मोर दिसला म्हणेस्तोवर तो दिसेनासा झाला. उसात शिरला.

चुटपुटताच मोर पहायला मिळाला म्हणून वाईट वाटलं. अंधार पडू लागलेला होता. गावात लांब जायचं म्हणून परत फिरलो; पुन्हा यायचा निश्चय करूनच.

आणि खरंच आम्हाला मोरांनी वेड लावले. रविवारची सुट्टी आली. सकाळी लवकर आंघोळपांघोळ आटपून मोर पहायच्या मोहिमेवर निघालो. आता वाट माहीत झाली होती. फारूक भराभरा चालत होता. माझ्यापेक्षा त्याचा चालण्याच्या बाबतीत उत्साह, वेग दांडगा.

रस्त्याच्या कडेला पिवळ्या फुलांचे गुच्छ अंगाखांद्यावर झुलवीत असंख्य तरवडीची झुडपं उभी होती. दवानं जमीन ओलसर झालेली. आदले दिवशी पावसाची सर येऊन गेली होती.

ओढ्यात थोडं पाणी आलं होतं. पांदीतून अधिक चिखल झालेला होता. चिखलाने जड झालेल्या चपला सावरीत होतो. चप्पल हातात घ्यावी तर जिकडेतिकडे बाभळीचे काटे पसरलेले. छोट्या ओढ्यापाशी आलो इतक्यात ' म्याऽऽ ओऽऽऽ ' चा नाद कानावर आला. आवाजाच्या अनुरोधाने पाहिले. काही दिसेना. समोर चिंचेची झाडं होती. झाडावर नजर गेली. मी फारूकला खुणावलं, चटकन खाली बसलो. मान उंचावून पाहू लागलो.

सूर्य नुकताच उगवलेला. त्याची कोवळी किरणं पसरली होती. किरणात चिंचेची पानं चमचमत होती. झाडाच्या डोकीवर लांबलचक पिसारा तोलून मोर उभा होता. उंच मान करून कुठेतरी पहात होता. सूर्यकिरणात त्याची रेखीव आकृती दिसत होती. पेन्सिलने बाह्यरेषा काढून दाखवता याव्यात असा तो दिसत होता. त्याच्या अंगचा रंग मुळीच उठून दिसत नव्हता. उलट काळसर वाटत होता. पण त्याची आकृती मोठी विलोभनीय दिसत होती. भान हरपून आम्ही कितीतरी वेळ बसलो होतो. अचानक तो फडफड करीत उडाला. त्याचा हिरवा रंग चकाकला. जवळ जवळ साडेतीन–चारफुटी पिसारा तोलत तो वेगात उडत लांबच्या शेतात उतरला व नाहीसा झाला.

या अपूर्व मोरदर्शनाने भारून आम्ही घरी परतलो. वाटेत तरवडीचे गुच्छ घेत होतो. डोकीवर भाकरीचं छोटं गाठोडं घेतलेला शेतमजूर भेटला. त्यानं कुतुहलानं विचारलं – ' कुनाच्या मळ्यात आला व्हता ? ' म्हणजे आम्ही कोणाचे पाव्हणे हे त्याला विचारायचं होतं. उत्तर दिलं – ' मोर पहायला आलो होतो. ' तसा तो कौतुकानं म्हणाला ' लई निर्मळ

जात बघा. आपल्या मानसावानी नव्हे. मोरनी मोराचे अश्रू टिपते. मंग तिला पिल्लं व्हतात. लई निर्मळ पाखरू. देव पांखरू हाय बघा ! '

मोराला त्यानं ' देव पाखरू ' शब्द वापरला. मला तो फार आवडला.

पुढं तो म्हणाला – ' सकाळच्या पारी पांदीतनं झाडावर बसल्यालं असत्यात ! '

म्हणजे मोर पहाताना झाडाच्या फांद्याही निरखल्या पाहिजेत हे लक्षात आलं.

सुट्टी मिळाली की आपोआपच रानाकडे पावलं वळायला लागली. पायांना बाभळीचे, बोराटीचे कितीतरी काटे टोचले. मोराचा आवाज ऐकला की त्या दिशेनं झपाझप जायचो. तो लांबून दिसला की जवळून पहाता यावा म्हणून त्याच्या दिशेने पळायचो. चाहूल लागली की तो नाहीसा व्हायचा. मग निराश व्हायचो. पुन्हा झाडं–झुडपं निरखीत चालू लागायचो.



एक बच्चा मोर शेतात भुईमूग टिपताना दिसला. त्याला अजून पिसारा आलेला नव्हता. त्याच्या मागे लागलो तसा तो पळू लागला. त्याचा पाठलाग सुरू केला. बाणासारखा तो गायब झाला. हा: हा: करत हाकत

बसलो. मग विहीरीपाशी थांबलो. विहीरीत वाकून पाहिलं. विहीरीच्या कपारीत पिंपर्णीचं झुडूप उगवलेलं होतं. त्यावर बाया पक्षांची घरटी झुलत होती. अचानक झुडुपाआडून दोन पांढरीशुभ्र घुबडे फडफड करीत बाहेर आली नि नाहीशी झाली.

शेतातून तित्तर तुरुतुरु पळताना कधीतरी दिसायचे. बाया घरट्यावर लोंबकळताना दिसायच्या. तर ओढ्याकाठी हमखास भारद्वाज दिसायचे. पारवे, वल्हे नेहमीच दिसायचे.रानसाळुंक्या, चिमण्या, कोकीळा याही दर्शन द्यायच्या. इथं कोकिळा भरपूर दिसतात हे विशेष वाटले.

मोर पहायला ही खुळी माणसं येतात हे शेतातल्या लोकांना माहीत झालं होतं. त्यामुळे शेतातून जाताना कुणी आम्हाला हटकत नसे. किंवा शेतातून हिसकावून लावत नसे. माढ्यात मोरांमुळे आम्ही रमू लागलो.

मोर आम्हाला इतक्या विविध तऱ्हेने, विविध सौंदर्याने दिसले की आम्ही एकदम खूष झालो.

म्याऽऽओऽऽऽ करून मोराने साद घातली की लांडोऱ्या एक एक करून विविध दिशेने, हळूहळू, चाहूल लागू न देता मोराकडे यायला निघतात.जरादेखील कोणाची चाहूल लागली की त्यामागे फिरतात, लांडोरीची देखणी हिरवट मखमली मान उठून दिसते. त्यावर तुरा शोभून दिसतो. पंखाचा रंग मातकट काळा,थोडीशी तांबूस झाक असलेला. उंच पिवळसर पाय. चाल ऐटदार. पण झुडुपाझुडुपात दडून बसायची सवय.हालचालीत चोरटेपणा दिसतो.



एकदा असाच मोर छोट्या लिंबाच्या झाडाच्या कापलेल्या फांदीवर उभा ठाकलेला दिसला. त्याचा पिसारा जमिनीपर्यंत ठेकत होता.त्यावरचे निळे जांभळे डोळे पिवळ्या महिरपीत उठून दिसत होते. निळी निळी मान झाक मारीत होती. माथ्यावरचा तुरा ऐटीत संभाळत तो पहात होता. थोड्या वेळाने तो झेप घेऊन खाली उतरला. झपाझपा चालू लागला. जोरदार वाऱ्या मुळे त्याचा पिसारा एकीकड कलत होता. तिरकस तिरकस होत होता. मग अचानक एका झुडुपाआड तो पाय पोटाला लावून जमिनीवर बसला. पाठीमागे पिसारा पसरलेला असा तो अर्धा अर्धा तास स्तब्ध बसू शकतो. झाडाआड उभा राहू शकतो. झाडांच्या फांद्यात कोणालाही चाहूल लागू न देता लपून बसतो.

लांडोर–मोर दिसत होते पण अजून मोर नाचताना दिसत नव्हते. याचे वाईट वाटत होतं.

एक शेतकरी म्हणाला – ' या शेतात सांच्यापारी रोज मोर नाचत्यात. नाचताना त्यांच्या पिसांचा बॅंग बॅंग आवाज हुतो. ऐकाय येतु ?

हे ऐकून त्याचा हेवा वाटला. मग आम्ही सायंकाळी जायला सुरुवात केली. मोर–लांडोर दिसायचे पण आमची चाहूल त्यांना फर्लांगावरून लागायची. ते झुकांड्या देऊन पसार

व्हायचे. शेतात बायका भांगलण करत होत्या. आम्हाला शेतात बघून म्हणाली – ' काय बगताय ? ' कारण कळल्यावर म्हणाली – ' या बोरीखाली रोज मोर नाचतू. '

मी निराशेनं म्हटलं – ' आम्हाला अजून नाचताना दिसला नाही. '

ती हसली. म्हणाली – ' सकाळी बी उजाडता उजाडता नाचतू आम्हांला दिसतू नाचताना. '

म्हटलं – ' तुम्हांला बघून बिचकत नाही ! '

' न्हाई. आमची सवय झालीय त्येना. आमाला शेतात कामं करताना बघत्यात ती. आनी तुमची कापडं लई वेगळी असत्यात. आमची मळखाऊ रानात शोभणारी कापड असत्यात. म्हणून तुम्हाला ती बिचकत असत्याल ! '

आम्हाँला मोर का बिचकत आहे हे आता कळले.

दसऱ्याची सुट्टी होती. भल्या पहाटे उठलो.मात्र उजाडायच्या आत रानात जायचं ठरविलं. मोर नाचताना दिसला तर किती आनंद होईल. हा विचार मनात बाळगून चालू लागलो.



ओढ्याला थोडे पाणी होते. रस्त्यात,शेतात पावसाची ओल होती. ओढा ओलांडला. शेतात पाऊल घातले. वितभर उंच ज्वारीची रोपे आली होती. सगळीकडे. पोपटी रंगाचे राज्य होते. केकताडीचा फड बाजूला सारून लिंबाच्या झाडापाशी आलो आणि थबकून उभे राहिलो. चटकन गुपचुप खाली बसलो. समोर मोर

नाचत होता ! त्याची पाठ आमच्याकडे होती. पिसारा पूर्ण फुललेला. त्याच्या असंख्य पांढऱ्या काडचा अर्धगोलाकृती पसरलेल्या होत्या. त्याच्या त्या पांढऱ्या काडीच्या दोन्ही बाजूला हिरव्या निळचा केसांची दाट गर्दी झालेली. यातून केळीच्या कोक्यासारखा तांबूस आकाराचा भाग लवलव हालत होता. या पिसाऱ्यातून त्याचे पाय दिसत नव्हते.

दूर मान मुरडून दिमाखात लांडोर उभी होती, ती जणू काय म्हणत होती, ' रोजचंच तुमचं मेलं नाचणं ! त्याचं काय एवढं कौतुक ! '

मोर तसाच नाचत होता. मधूनच फडफड करीत पिसं फटकारत होता. अचानक त्याने गिरकी मारली. झर्रकन हिरव्या पिसांवरचे निळे डोळे नील मण्यासारखे लखलखले. त्याचं धुंद होऊन नाचणं, लांडोरीचा मानभावीपणा, सारं सारं अपूर्व होतं. वेड लावणारं होतं.

इतक्यात त्याला पावलांची चाहूल लागली. झर्रकन पिसारा मिटवून तो केदाळात नाहीसा झाला. तो नाचत होता त्या जागेकडे आम्ही धावलो.आजूबाजूची जागा निरखली. एकादे त्याचे पिस पडले असेल, तर मिळेल. याची आशा वाटत होती. पण निराश झाली.

परतताना फारूक म्हणाला– ' आपल्याला मोराचं पिल्लू मिळालं तर संभाळूया. '

मी म्हटलं– ' कुठं ठेवायचं ? '

' सातारला ठेवू. तिथं बंगल्याभोवती बाग आहे छानशी. राजाला मोराबद्दल कळविलं होतं. तो म्हणतो, पिल्लू सांभाळूया.'

मला कल्पना आवडली.

मोराचं पिल्लू सापडेल का म्हणून शेतातून विचारायला सुरवात केली. ' कशाला ? तर सांभाळायला, ' हे सांगून झालं. शेतकरी म्हणाले– ' लई चपळ जात. गावत न्हाई. पर अंडी सापडत्यात कधी कधी. ती दीन !

' अंडी घेऊन पिल्लं काढायची कशी ? '

' कोंबडी रवण काढती बघा. कोंबडीच्या अंड्यात मोराची अंडी मिसळायची, कोंबडीला काय उमजत न्हाई. ती अंडी उबवती. '

' मग अंडी मिळाली तरी द्या. आम्ही ती उबवून घेऊ. ' म्हणून त्यांना सांगितलं. त्यांनी हो म्हणून होकार भरला.

हिवाळा आला. हिवाळ्यात मोरांची पिसं झडतात. मग ही गळलेली पिसं सापडतील हे लक्षात आलं. तसं दिवाळीच्या सुट्टीहून परतल्यावर रानात शिरलो. मोर दिसला. भुंडा झालेला. मान ते खांद्यापर्यंतचा भाग निळाभोर. डोकीवरला सुंदर तुरा. पांढरट पोट. खांद्यावरचे पंख घारीसारखे दणकट. त्यावर काळसर पांढरट ठिपके वा रेषा. मधूनच तांबूस झाक मारत होती. तीक्ष्ण डोळे, डोळ्यावरची पांढरी महिरप उठून दिसत होती. दणकट, किंचित बाकदार पिवळी चोच. पिवळ्या चोचीपर्यंत डोळ्यांची पांढरी महिरप आलेली. फिकट पिवळे पण ओबडधोबड दिसणारे

पाय. हे सारं जवळून दिसलं. अर्थात आम्ही झुडपाआड स्तब्ध बसलो होतो. तो निघून गेल्यावर आम्ही वगळीतून, पांदचातून, झुडपाखाली पिसं शोधायला सुरवात केली.

एका वगळीत मोठं आख्खं पिस पडलं होतं. फारूकने ते उचलले. त्याने पुढे पांढरट रंगाचे पिस नाजूकपणे पानावर पडलं होतं, ते उचललं. जवळच काळपट, वीतभर लांब पीस होते. दोन्ही पिसं निरखली. त्या पांढऱ्या पिसाची टोके तकतकीत हिरवी व्हायला लागली होती. काळपट पीस उन्हात झर्रकन चमकले, तेही निळे निळे. पुढं जाऊ तशी पिसं सापडत होती.ती वेगवेगळचा आकाराची व रंगाची.दोन पिसं घारीच्या पिसासारखी होती. एक काळसर त्यावर पांढरट लाटेसारख्या रेषा होत्या. दुसरे तांबूस रंगाचे होते. एका छोटचा पिसावर अर्धवट डोळा उमटलेला होता. जणू नुकताच त्या पिसाला डोळा फुटत होता ! पांढऱ्या पिसाला गुलाबी, विटकरी रंगाची, टोकाला झाक असलेलं होतं. कधी हिरव्या सरळ बारक्या पिसावर काडीकडून दाट मखमलीपणा येऊ लागलेला होता. मिळालेली पिसं प्लॅस्टीकच्या पिशवीत अलगद ठेवली. घरी येऊन टेबलावर मांडली. आणि मोराच्या पिसांवर कसकसे रंग चढत हिरवानिळा होतो हे लक्षात आले. सृष्टीचे एक रहस्य जणू आम्हाला समजले याचा आनंद झाला.

हिरव्या बाटलीत पिसं व्यवस्थित ठेवली. येता जाता ही पिसं पहाताना आनंद व्हायचा.

दुसरा श्रावण आला. श्रावणात मोर धुंद होऊन नाचतात. मेघ आले की आर्तपणे षड्जात म्याऽ ओऽऽऽ म्हणून ओरडतात.

हा आवाज काढताना मानेचे आकुंचन प्रसरण वेगात होते. पाऊस आला की ते पिसारा उलगडतात आणि नाचतात.

एका सुरम्य श्रावणातल्या सकाळी शेतात गेलो. शेतं हिरवीगार झालेली होती. ओढा वहात होता. मोर दिसत नव्हता. म्याऽओऽऽ चा टाहो कानी आला. झुडुपातून आपल्याच नादात मोर शेतात आला. तत्काळ आम्ही झुडुपाआड बसकण मारली. मोर आम्हाला व आम्ही मोराला चकवायला शिकलो होतो. कोवळ्या उन्हात मोराचा हिरवागार पिसारा डोळ्यात मावत नव्हता. अचानक त्याने टाहो फोडला म्याऽ ओऽऽऽ निळीभोर मखमली मान वेगाने खालीवर होताना दिसत होती. त्याचे डोळे झुडुपाआड रोखलेले होते. वाऱ्याच्या लहरी बरोबर त्याचा पिसारा नाजूकपणे हालत होता. हिरव्यागार मखमली गवताला वाऱ्याने खटयाळपणे धक्का देवून जावे आणि मग छोटयाश्या लाटा पसरत जाव्यात तशा लाटा पिसाऱ्यावर झुलत होत्या. पिसाऱ्यावरचा एकही डोळा दिसत नव्हता. नुसता तेजाळ हिरवा रंग दिसत होता. आणि मानेचा गर्द निळा रंग चकाकत होता. डोळ्यांत प्राण आणून, दहा-बारा हातावर उभे असणारे ते देव पांखरू मी निरखत होते.

लांडोरीला हाका मारून शेवटी तो दमला आणि तो निघून गेला. पण त्याच्या हालचालीतील उत्सुकता, अस्वस्थता मात्र दिसली होती.

अंडी वा पिल्लू मिळाले असे वाटत होते. काहीच मिळाले नव्हते. शेतकऱ्यांच्या बोलण्यातून कळले की मोराची अंडी

झाडोऱ्याआड गंजीवर कुठेपण मिळतात. दोन ते चार अंडी सापडतात. आम्हाला खुळ्यासारखे वाटत होते. लांडोर कोंबडीसारखी रोज अंडी घालत असेल. मे – जून हा मोरांचा विणीचा हंगाम असतो. सर्व लांडोऱ्या मिळून पिल्लांची काळजी घेतात हे समजले. मोर हल्ला करावयाचा झाल्यास प्रथम डोळे फोडतो. हे कुणीतरी सांगितले. शेंगा, किटक, आळ्या, कांगूण्या वगैरे त्याचे खाद्य असते. ही सर्व माहिती गोळा झाली. पण अंडी मिळाली नाहीत. वा पिल्लूही मिळाले नाही.

एकदा असेच निघाले असता– ओढ्यातून एक लांडोर वर आलेली दिसली. विशेष म्हणजे तिच्या पाठोपाठ चार–पाच पिल्ले उंच पायावर दुडूदुडू चालत होती.

याही वर्षी पिसं गोळा केली. गावाला जाताना मोठ्या आपुर्वाईने आम्ही ही पिसं भेट देण्यासाठी नेऊ लागलो.

श्रावण आला. पुन्हा आम्ही रानात हजर.

दसरा आला घरोघरी घट बसलेले. शेते देखणी दिसू लागलेली. शेतातही पाखरं पहात पांदीत आलो. थबकलो. मोर नाचत होता. पण त्याला चाहूल लागली. तो गुडूप झाला. लिंबाच्या झाडाला पाठ देऊन बसलो.

कुतुहालाने राकाडी मुले जवळ आली. आसपास शेळ्या, गाय, बैल चरत होते. एकजण नुसत्या चड्डीवर होतं. असेल सहा सात वर्षाचे. त्याने विचारले.

कशापाई आला ? ’

नेहमीचे उत्तर दिले. ' मोर पहायला '

तो एकदम म्हणाला– ' मोराची अंडी बगायची ? ' मी आनंदाने उभी राहिले. पायात चप्पल सरकवत म्हणाले– चल लवकर. दाखव ती अंडी. '

ते पोर आपल्या नादात पुढे चालत सांगू लागले– तीन अंडी हायती. रोज लांडोर बसती त्यावर. '

पांद ओलांडून शेतात प्रवेश केला. भाताच्या कडेनं विहीर पाठीमागे टाकून बांधावरून चाललो. समोर दोन कडब्याच्या गंजी रचलेल्या होत्या. एका गंजीला मागे टाकले. दुसरीपाशी आलो. बांधावर उभे राहिलो. पोर म्हणाले, लांडोर उडून गेली बगा त्या उसात ? ' ती कशी, केव्हा उडून गेली हे कळलंही नव्हतं. जराही पंखाचा आवाज झाला नव्हता.

गंजी उंच होती. टाचा वर करूनही अंडी दिसेनात. मग पदर खोवला. साडीच्या निऱ्या खोचल्या. चप्पल काढले. कडब्यावर पाय रोवत गंजीवर चढले.

वर आले. खोलगट गोल भागात तांबूस, तीन अंडी दिसत होती. कोंबडीच्या अंड्यापेक्षा ही अंडी थोडी मोठी होती. तिथं हात ठेवला, गरम, उबदार जागा वाटली होती. शेजारी दुसरा एक गोलसर उथळ खड्डा होता. एका अंड्याचं टरफल पडलेलं होतं. बहुदा दुसऱ्या लांडोरीची पिल्ले उबवून झाली. ती अंड्यातून पडलेली होती.

ती तीन अंडी पाहून विचार आला,' एक अंड लांडोरीला ठेवावं. दोन आपण घ्यावीत. कोंबडी रवण बसवून उबवावीत. आपणाला मोराची पिल्लं सांभाळायला मिळतील.'

दुसरं मन म्हणालं – ' काय दुष्ट बाई आहेस तू ? एका आईच्या पोटाखालून तिची पिल्लं पळवतेस ? तसा तुला काय अधिकार ? कोंबडीनं नीट अंडी उबवली नाही तर? तुला पिल्लांची नीट काळजी घेता आली नाही तर ती मरून जातील. हे पाप करणार तू ? या लांडोरीचा शाप घेणार तू ? '

अंडी उचलायला हात धजावेनात. डोळे भरून अंडी पाहिली. खाली उतरले. चप्पल पायात सारून गपगप निघाले. ते पोर म्हणाले, ' बाई बघा, लांडोर अंड्यावर बसलीय. '

मान वळवून पाहिलं डोकीवर डौलानं तुरा सांभाळीत, हिरवी मान अभिमानानं उंच करीत पंख फुलारून लांडोर बसली होती.

तिचं आईपण डोळ्यांत साठवून समाधानानं घरी परतलो.

BVBK-0401738